# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- ९०-२३** **दिनांक :- २०/०३/२०२३**

## नव्याने होणा-या सायबर फसवणूकीसंदर्भात दक्षता घेण्याबाबत मिरा- भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालयाचे वतीने नागरिकांनी आव्हान.

सध्या भारतामध्ये डिजीटल इकोनॉमीचा झपाट्याने प्रसार होत आहे. अनेक जण पैशाच्या रोकड व्यवहारांऐवजी डिजीट व्यवहारांनाच प्राधान्य देतात. मात्र डिजीटल व्यवहारांमध्ये बँकींग फ्रॉडचा धोका वाढला आहे. आरोपी नागरिकांच्या बँक खात्यामधून पैसे काढण्याकरीता विविध मार्गाचा अवलंब करण्याकरीता वेगवेगळया शक्कल लढवित आहेत. अशा परिस्थितीमध्ये नागरिकांनी सतर्क राहणे आवश्यक आहे.

सन २०२२ मध्ये दाखल गुन्हयांचे अवलोकन केले असता मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात ठेवी ठेवणारे आरोपीत कंपन्या/ आरोपी हे ठेवीदारांना आकर्षक व्याजदर, दाम दुप्पट योजना व उत्तम परतावा देण्याचे आमिष दाखवून, शेअर मार्केटमधील गुंतवणूक इत्यादी माध्यमातून फसवणूक करण्याचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यासोबतच मोबाईलवरील ऑनलाईन ॲप/लिंक तसेच कर्ज देणारे मनी लेंडीग ॲप या माध्यमातून पैसे गुंतवणूक करण्यास सांगून कमी कालावधीत कर्ज देण्याचे आमिष देवून सामान्य जनतेस बळी पडण्यास भाग पाडत आहेत. अशा प्रकारे सामान्य जनतेने गुंतवणूक करताना खालील प्रमाणे काळजी घ्यावी.

### -:घ्यावयाची काळजी :-

- **मोबाईलवर प्राप्त होणा-या आकर्षक व्याजदर, दामदुप्पट योजना व उत्तम परतावा देणा-या स्किमच्या लिंकवर क्लिक करू नका अथवा त्यावर नमूद असलेल्या मोबाईलवर संपर्क करू नका.**
- **ऑनलाईन ॲप/लिंक देणारे मनी लेंडींग ॲप वापरताना आपल्या मोबाईलमधील फोटो, कॉन्टॅक्ट लिस्ट, एस.एम.एस. वा इतर परमिशन्स देवू नका.**
- **शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करताना आमिषाला बळी पडून नये तसेच गुंतवणूक करण्यापुर्वी संबधित संस्थेने सेबीकडे नोंदणी केली आहे का याची पडताळणी करावी.**
- **अनोळखी इसमाकडे पैसे देवून गुंतवणूक करणे टाळावे. परिचय होईल त्याप्रमाणे पडताळणी करून गुंतवणूक करावी अथवा मोठी आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता आहे.**
- **तुमचे ब्राऊजर्स नियमीत अपडेट करुन घ्या, अँटी व्हायरस इन्स्टॉल करून घ्या. वेबसाईटवर जाण्यापुर्वी https आहे का हे पहा. तसेच डोमेन नाव एकदा चेक करा.**
- **बँक अकाऊंट लॉगईन करण्यापुर्वी URL कडे लक्ष दया. कोणतेही स्पॅम मेल ओपन करू नका अशा मेलमध्ये असलेल्या लिंक क्लिक करू नका.**

तरी मिरा-भाईंदर, वसई-विरार शहरातील नागरिकांना सायबर गुन्हे कक्ष, मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातर्फे जाहिर आवाहन करण्यात येत की, अशा प्रकारे होणा-या फसवणूकीबाबत सतर्क रहावे. तसेच अशा प्रकारे कोणत्याही इसमाची फसवणूक झाल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

-----oooo----